पर्यावरण विषयक कार्यक्रम

Call for Green Ideas

**महाराष्ट्र शासन**

**पर्यावरण विभाग**

**शासन निर्णय क्रमांकः इएनव्ही -२०१४/प्र.क्र.३६/तां.क.३**

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२

दिनांक : २२ जानेवारी, २०१५

**वाचा :**

1) **या विभागाचा शासन निर्णय क्रमांकः योजना-२००७/प्र.क्र.३४/तां.क.३, दि.३ ऑक्टोबर, २००७**
2) **या विभागाचा समक्रमांकाचा पत्र दिनांक :०१ सप्टेंबर, २०१४**

**प्रस्तावना :**

पर्यावरण संवर्धनार्थ राज्याच्या स्थानिक गरजा लक्षात घेवून लोकसहभागातून नाविन्यपूर्ण कार्यक्रम पर्यावरण विभागामार्फत सन २०१०-२०११ पासून राबविण्यात येत आहेत. या अनुषंगाने दिनांक २५ जुलै,२०१४ रोजी या कार्यक्रमासाठी गठीत सुकाणू समितीची बैठक पार पडली. या बैठकीत घेतलेल्या निर्णयानुसार दि.०१ जानेवारी, २०१४ ते दि.३० जून, २०१४ या कालावधीत प्राप्त प्रस्तावांपैकी सुयोग्य प्रस्ताव निवडून त्यांना निधी वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:**

लोकसहभागातून पर्यावरण संवर्धन नाविन्यपूर्ण कार्यक्रम राबविण्यासाठी मागविण्यात आलेल्या प्रस्तावांपैकी दि.०१ जानेवारी,२०१४ ते दि.३० जून, २०१४ या कालावधीत प्राप्त प्रस्तावांमधून खालील प्रस्तावांना (फेरी नऊ अन्वये) मंजूर व वितरीत करावयाचा निधी खालील प्रमाणे :-

(रूपये लाखात)

| अ.क्र | व्यक्ती / संस्थेचे नांव | योजनेचे संक्षिप्त तपशिल | मंजूर व मुक्त करावयाचा निधी (रू.लाखात) |
|---|---|---|---|
| अ) | **जनजागृती विषयक प्रस्ताव :** | | |
| १) | प्रयास सेवाभावी संस्था, गेवराई, जिल्हा बीड. | बीड जिल्ह्यातील बालाघाट पर्वत रांगामधील गावातून जैव विविधता मंडळाची स्थपना करून गावातील जैव विविधता रजिस्टरच्या माध्यमातून गावतील जैव विविधतेचे जतन करणे. | ३.०० |
| २) | नेचर अॅन्ड इनव्हायरमेंट सोसायटी, ठाणे. | पक्षी हा घटक केंद्रस्थानी ठेवून आदिवासी आश्रम शाळेच्या परिसरातून जैव विविधतेविषयी जनजागृती करणे | १२.०० |
| ३) | राजाराम कॉलेज विद्यानगर, कोल्हापूर. | कोल्हापूर जिल्ह्यातील पश्चिम घाट क्षेत्रातील विविध किल्यातील जलस्त्रोताचे सर्वेक्षण व संवर्धन करणे | ३.०० |
| | **एकूण :** | | **१८.००** |

| अ.क्र | व्यक्ती / संस्थेचे नांव | योजनेचे संक्षिप्त तपशिल | मंजूर व मुक्त करावयाचा निधी (रू.लाखात) |
|---|---|---|---|
| क) | **अमलबजावणी प्रकल्प :** | | |
| १) | इंडियन हरपिटोलॉजीकल सोसायटी,पुणे. (Indian Herpetological Society, Pune ) | स्थायी पर्यावरणीय विकासाई विविध गोष्टीचे पुनर्चक्रीकरण. | १४.८० |
| | **एकूण :** | | **१४.८०** |
| | **एकूण (अ+ब+क)** | | **३२.८०** |

२. या शासन निर्णयाद्वारे उपरोक्त रु. ३२.८० लक्ष ( रुपये बत्तीस लक्ष ऐंशी हजार फक्त ) संबंधितांना मंजूर व मुक्त करण्यास मान्यता देण्यात येत आहे. सदर निधी वितरणाबाबत अटी व शर्ती विस्तृतपणे सोबतच्या सहपत्रात नमूद करण्यात आलेल्या आहेत.

३. यासाठी कार्यासन अधिकारी, पर्यावरण विभाग (Section Officer, Environment Department) यांचे नांवे रु. ३२.८० लक्ष ( रुपये बत्तीस लक्ष ऐंशी हजार फक्त ) एवढया रकमेचा धनादेश काढण्यात यावा व त्यानुसार संबंधितांना त्यांच्या नावासमोर नमूद रक्कम स्वतंत्ररित्या धनादेशाद्वारे अदा करण्यात यावी.

४. उपरोक्त अदा करावयाचे रु. ३२.८० लक्ष ( रुपये बत्तीस लक्ष ऐंशी हजार फक्त ) अधिदान व लेखाअधिकारी यांच्यामार्फत कोषागारातून काढून संबंधितांना अदा करण्यासाठी आहरण व संवितरण अधिकारी म्हणून श्री. र.ल.लखोटे, कक्ष अधिकारी, पर्यावरण विभाग व नियंत्रण अधिकारी म्हणून श्री. सो.ना.बागुल, उपसचिव, पर्यावरण विभाग, मंत्रालय यांना घोषित करण्यात येत आहे. त्यांनी संबंधित व्यक्ती / संस्था यांना वितरीत करावयाचे एकूण रु. ३२.८० लक्ष ( रुपये बत्तीस लक्ष ऐंशी हजार फक्त ), अधिदान व लेखाधिकारी कार्यालय, मुंबई येथून एकत्रित धनादेशाद्वारे वितरीत करण्यासाठी प्राप्त करण्याची कायर्वाही करावी.

५. सदर होणारा खर्च हा, क्र. यु-३४३५-परिस्थितीकी व पर्यावरण, ०४, प्रदुषण प्रतिबंध व नियंत्रण १०३, वायू व जल प्रदूषण प्रतिबंध, पंचवार्षिक योजनांतर्गत योजना-राज्य योजनांतर्गत योजना, (०२) पर्यावरण प्रतिबंध (०२)(१३) पर्यावरणविषयक जनजागृती, शिक्षण व वातावरण बदल कृती योजना (३४३५ १३०२) ३१, सहायक अनुदान, या लेखाशिर्षाखाली खर्ची घालावा व तो सन २०१४-१५ च्या मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा. सन २०१४-२०१५ या वर्षात सदर लेखाशिर्षाखाली एकूण रु. २००.०० लक्ष एवढी तरतूद अर्थसंकल्पीत करण्यात आलेली आहे.

६. हा शासन निर्णय नियोजन विभागाच्या व वित्त विभागाच्या सहमतीने आणि वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक ०५/१५/व्यय-१६, दिनांक ०६ जानेवारी, २०१५ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१५०२२४१३२४०६२३०४ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Ravindra Laxmikant Lakhote

Digitally signed by Ravindra Laxmikant Lakhote
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Section Officer, postalCode=421202, st=Maharashtra, cn=Ravindra Laxmikant Lakhote
Date: 2015.02.24 13:34:09 +05'30'

(र . ल . लखोटे)
**कार्यासन अधिकारी**

**प्रत,**

१. जिल्हाधिकारी, जिल्हा बीड, कोल्हापूर, ठाणे, पुणे.
२. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद बीड, कोल्हापूर, ठाणे, पुणे.
३. संबंधित व्यक्ती/संस्था
४. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परीक्षा),महाराष्ट्र १/२,मंबई/ नागपूर.
५. अधिदान व लेखा अधिकारी, मंबई.
६. निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई.
७. मा.मंत्री, पर्यावरण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय,मुंबई.
८. मा.राज्यमंत्री, पर्यावरण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय,मुंबई.
९. प्रधान सचिव, पर्यावरण विभाग यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मंबई.
१०. वित्त विभाग (कार्यासन क्रमांक व्यय-१६/अर्थसंकल्प-७), मंत्रालय, मुंबई.
११. नियोजन विभाग, कार्यासन क्र.१४७२, मंत्रालय, मंबई.
१२. संबंधित जिल्हा प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ.
१३. रोखशाखा, पर्यावरण विभाग, मंत्रालय, मुंबई.
१४. सर्व कार्यासने, पर्यावरण विभाग, मंत्रालय, मुंबई.
१५. निवडनस्ती

**<u>पर्यावरण विभाग, शासन निर्णय क्र. ईएनव्ही-२०१४/प्र.क्र.३६ /तांक-३, दि. २२ जानेवारी,२०१५ चे सहपत्र</u>**

पर्यावरण विभाग, पत्र क्र. इएनव्ही-२०१४/प्र.क्र.३६/तांक-३, दि. ०१ सप्टेंबर, २०१४ नुसार निवड प्राप्त "प्रयास सेवाभावी संस्था, गेवराई" यांच्या "बीड जिल्ह्यातील बालाघाट पर्वत रांगामधील गावातून जैव विविधता मंडळाची स्थपना करून गावातील जैव विविधता रजिस्टरच्या माध्यमातून गावतील जैव विविधतेचे जतन करणे." या संकल्पनेवरील प्रस्तावास सुकाणू समितीच्या निर्णयानुसार राबविण्याच्या कार्यक्रमाबाबतच्या अटी व शर्ती पुढीलप्रमाणे :-

१) प्रस्तावित संकल्पना बीड जिल्ह्यातील बालाघाट पर्वत रांगामधील १० गावातून जैव विविधता मंडळाची स्थपना करून गावातील जैव विविधता रजिस्टरच्या माध्यमातून गावतील जैव विविधतेचे जतन करण्याचा कार्यक्रम राबविण्यात यावी. सदर कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी "प्रयास सेवाभावी संस्था, गेवराई", यांना रु. ३.०० लक्ष (रुपये तीन लक्ष फक्त) मंजूर व मुक्त करण्यात येत आहे. सदर कार्यक्रम राबविण्यासाठी संस्थेनी १०% हिस्सा म्हणजेच किमान रु. ३०,०००/- किमान खर्च करावयाचा आहे. त्यासाठी संस्थेनी एकूण रु. ३.३० लक्ष खर्चाचा संपूर्ण तपशिल बाब-निहाय तात्काळ सादर करण्यात यावा, त्यानंतरच काम हाती घेण्यात यावे.

(२) प्रकल्पांतर्गत वितरीत करण्यात येणारी सर्व माहिती, साहित्य (पोस्टर्स, बॅनर्स इतर) मान्यतेसाठी प्रथम विभागास पाठविण्यात यावी. ( सॉफ्ट व हार्ड कॉपी ) विभागाच्या मान्यतेनंतर सदर साहित्य वितरीत, प्रदर्शित करता येईल.

(३) कार्यक्रमाच्यावेळी तसेच प्रकल्पासंबंधित सर्व माहिती वर (पोस्टर्स, बॅनर्स, स्टिकर्स इ.) "पर्यावरण विभाग, महाराष्ट्र शासन पुरस्कृत योजना" असे दर्शनी भागवर ठळक अक्षरात फलक लावणे अथवा प्रदर्शित करणे बंधनकारक आहे. याबाबतचा फोटो दिनांक व वेळ प्रदर्शित होईल यांची दक्षता घेवून शासनाकडे पाठविणे आवश्यक राहिल.

(४) जनजागृतीसाठी निवडलेल्या १० गावांची नावे कार्यक्रम राबविण्याची रुपरेषा जसे दिनांक याचा तपशिल सादर करावा.

(५) प्रकल्पांतर्गत कार्यशाळा, प्रदर्शन, मेळावा, परिषद वा तत्सम उपक्रम होत असल्यास विभागास १० दिवस आधी सदर उपक्रमाबाबत अवगत करावे, जेणे करुन विभागातील प्रतिनिधी सदर उपक्रमास आवश्यकतेनुसार उपस्थित राहू शकतील.

(७) प्रकल्पासंबंधित प्रशासकीय / संबंधित यंत्रणेकडून आपला कार्यक्रम यशस्वीपणे पार पडला असल्याचे प्रमाणपत्र प्राप्त करुन ते विभागास सादर करणे.

(८) या कार्यक्रमाच्या अनुषंगाने प्रत्येक झालेल्या कार्यक्रमाचा फोटो व व्हिडियो चित्रण काढणे बंध्ंनकारक असून, त्यावर दिनांक व वेळ प्रदर्शित होईल यांची दक्षता घ्यावी व सदर फोटो व व्हिडियो प्रगति अहवालासोबत सादर करावा.

९) मान्य खर्चाच्या बाबींसाठी अन्य कोणत्याही स्त्रोतांमार्फत निधी प्राप्त होत असल्यास सदर बाब पर्यावरण विभागाच्या निदर्शनास आणून विभागाची पूर्व परवानगीने सदर खर्च करणे बंधनकारक आहे.

१०) संस्थेने दिलेल्या कार्यक्रमानुसार सदर निधीचा खर्च होत असल्याबाबतचे प्रमाणपत्र व प्रगति अहवाल दर महिन्याच्या १० तारखेपूर्वी पर्यावरण विभागास सादर करणे (सॉफ्ट व हार्ड कॉपी)

(११) सदर योजनेच्या अंमलबजावणीत पर्यावरण विभागास काही त्रुटी आढळल्यास त्यानुरुप आवश्यक ती कारवाई, न्यायालयीन कारवाई करण्यास पर्यावरण विभाग मुक्त असेल. तसेच कोणत्याही पूर्व सूचना न देता संस्थेस मंजूर केलेली योजना रद्द करण्याचा पूर्ण अधिकार पर्यावरण विभागाकडे असेल.

(१२) उपरोक्त कार्यक्रमाबाबत स्थानिक वृत्तपत्रात प्रसिध्दी देणे बंधनकारक असून सदर बाबतची पेपेर कटींग विभागाकडे सादर करणे अवश्यक आहे.

(१३) योजनांच्या अंमलबजावणीच्या खर्चाचे उपयोगिता प्रमाणपत्र विहित प्रारुपानुसार सादर करणे आवश्यक असेल ("विवरणपत्र-अ") तसेच योजना पूर्ण झाल्यावर त्याच्या यशस्वीपणाबद्दल अहवाल तसेच Completion Report व ऑडीट अहवाल देणे आवश्यक राहील.

(१४) वरील नमूद बाबींसंदर्भात रु. १००/- कोर्ट फी स्टॅम्प पेपरवर अटी व शर्ती मंजूर असलेले हमीपत्र सादर करणे बंधनकारक आहे.

Ravindra Laxmikant Lakhote

Digitally signed by Ravindra Laxmikant Lakhote
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Section Officer, postalCode=421202, st=Maharashtra, cn=Ravindra Laxmikant Lakhote
Date: 2015.02.24 13:34:36 +05'30'

(र. ल. लखोटे)

कार्यासन अधिकारी

**पर्यावरण विभाग, शासन निर्णय क्र. ईएनव्ही-२०१४/प्र.क्र.३६ /तांक-३, दि. २२ जानेवारी,२०१५ चे सहपत्र**

पर्यावरण विभाग, पत्र क्र. इएनव्ही-२०१४/प्र.क्र.३६/तांक-३, दि. ०१ सप्टेंबर, २०१४ नुसार निवड प्राप्त "नेचर ॲन्ड इनव्हायरमेंट सोसायटी, ठाणे" यांच्या पक्षी हा घटक केंद्रस्थानी ठेवून आदिवासी आश्रम शाळेच्या परिसरातून जैव विविधतेविषयी जनजागृती करणे या संकल्पनेवरील प्रस्तावास सुकाणू समितीच्या निर्णयानुसार राबविण्याच्या कार्यक्रमाबाबतच्या अटी व शर्ती पुढीलप्रमाणे :-

(१) प्रस्तावित संकल्पना राबविण्यासाठी नेचर ॲन्ड इनव्हायरमेंट सोसायटी, ठाणे यांना रु.१२.०० लक्ष (रुपये बारा लक्ष फक्त) मंजूर व मुक्त करण्यात येत आहे. याव्यतिरिक्त संस्थेचा किमान रु. १,००,०००/- रक्कमेचा सदर कार्यक्रमात अंतर्भूत असेल.

(२) पालघर व त्या जवळच्या क्षेत्रातील आश्रमशाळा परिसरातील पक्षांसंबंधी जैव विविधतेविषयी जनजागृती ६१ आश्रमशाळेत करण्यासाठी सदर निधी मुक्त करण्यात येत आहे. .

(३) कार्यशाळेसाठी वा प्रकल्पांतर्गत वितरीत करण्यात येणारी सर्व माहिती, साहित्य (पोस्टर्स, बॅनर्स इतर) मान्यतेसाठी प्रथम विभागास पाठविण्यात यावी ( सॉफ्ट व हार्ड कॉपी ) विभागाच्या मान्यतेनंतर सदर साहित्य वितरीत करता येईल.

(४) प्रकल्पांतर्गत निवडलेल्या आश्रम शाळेचे नांव कार्यक्रम राबविण्याच्या रुपरेषा जसे ठिकाण व दिनांक यांचा तपशिल सादर करावा.

(५) कार्यक्रमाच्यावेळी तसेच प्रकल्पासंबंधित सर्व माहिती वर (पोस्टर्स, बॅनर्स, स्टिकर्स इ.) "पर्यावरण विभाग, महाराष्ट्र शासन पुरस्कृत योजना" असे दर्शनी भागवर ठळक अक्षरात फलक लावणे अथवा प्रदर्शित करणे बंधनकारक आहे. याबाबतचा फोटो दिनांक व वेळ प्रदर्शित होईल यांची दक्षता घेवून शासनाकडे पाठविणे आवश्यक राहिल

(७) मान्य खर्चाच्या बाबींसाठी अन्य कोणत्याही स्त्रोतांमार्फत निधी प्राप्त होत असल्यास सदर बाब पर्यावरण विभागाच्या निदर्शनास आणून विभागाची पूर्व परवानगीने सदर खर्च करणे बंधनकारक आहे.

(८) प्रकल्पांतर्गत कार्यशाळा, प्रदर्शन, मेळावा, परिषद वा तत्सम उपक्रम होत असल्यास विभागास १० दिवस आधी सदर उपक्रमाबाबत अवगत करावे, जेणे करुन विभागातील प्रतिनिधी सदर उपक्रमास आवश्यकतेनुसार उपस्थित राहू शकतील.

(९) संस्थेने दिलेल्या कार्यक्रमानुसार सदर निधीचा खर्च होत असल्याबाबतचे प्रमाणपत्र व प्रगति अहवाल दर महिन्याच्या १० तारखेपूर्वी पर्यावरण विभागास सादर करणे (सॉफ्ट व हार्ड कॉपी)

(१०) प्रकल्पासंबंधित प्रशासकीय / संबंधित यंत्रणेकडून आपला कार्यक्रम यशस्वीपणे पार पडला असल्याचे प्रमाणपत्र प्राप्त करुन ते विभागास सादर करणे.

(११) या कार्यक्रमाच्या अनुषंगाने प्रत्येक झालेल्या कार्यक्रमाचा फोटो व व्हिडियो चित्रण काढणे बंधनकारक असून, त्यावर दिनांक व वेळ प्रदर्शित होईल यांची दक्षता घ्यावी व सदर फोटो व व्हिडियो प्रगति अहवालासोबत सादर करावा.

(१२) सदर योजनेच्या अंमलबजावणीत पर्यावरण विभागास काही त्रुटी आढळल्यास त्यानुरुप आवश्यक ती कारवाई, न्यायालयीन कारवाई करण्यास पर्यावरण विभाग मुक्त असेल. तसेच कोणत्याही पूर्व सूचना न देता संस्थेस मंजूर केलेली योजना रद्द करण्याचा पूर्ण अधिकार पर्यावरण विभागाकडे असेल.

(१३) उपरोक्त कार्यक्रमाबाबत स्थानिक वृत्तपत्रात प्रसिध्दी देणे बंधनकारक असून सदर बाबतची पेपेर कटींग विभागाकडे सादर करणे.

(१४) योजनांच्या अंमलबजावणीच्या खर्चाचे उपयोगिता प्रमाणपत्र विहित प्रारुपानुसार सादर करणे आवश्यक असेल ("विवरणपत्र-अ") तसेच योजना पूर्ण झाल्यावर त्याच्या यशस्वीपणाबद्दल अहवाल तसेच Completion Report व ऑडिट अहवाल देणे आवश्यक राहील.

(१५) वरील नमूद बाबींसंदर्भात रु. १००/- कोर्ट फी स्टॅम्प पेपरवर अटी व शर्ती मंजूर असलेले हमीपत्र सादर करणे बंधनकारक आहे.

Ravindra Laxmikant Lakhote

Digitally signed by Ravindra Laxmikant Lakhote
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Section Officer, postalCode=421202, st=Maharashtra, cn=Ravindra Laxmikant Lakhote
Date: 2015.02.24 13:34:53 +05'30'

(र . ल . लखोटे)

कार्यासन अधिकारी

**पर्यावरण विभाग, शासन निर्णय क्र. ईएनव्ही-२०१४/प्र.क्र.३६ /तांक-३, दि. २२ जानेवारी,२०१५ चे सहपत्र**

पर्यावरण विभाग, पत्र क्र. इएनव्ही-२०१४/प्र.क्र.३६/तांक-३, दि. ०१ सप्टेंबर, २०१४ नुसार निवड प्राप्त "राजाराम कॅालेज विद्यानगर, कोल्हापूर" यांच्या "कोल्हापूर जिल्ह्यातील पश्चिम घाट क्षेत्रातील विविध किल्यातील जलस्त्रोताचे सर्वेक्षण व संवर्धन करणे, या संकल्पनेवरील प्रस्तावास सुकाणू समितीच्या निर्णयानुसार राबविण्याच्या कार्यक्रमाबाबतच्या अटी व शर्ती पुढीलप्रमाणे :-

(१) प्रस्तावित संकल्पना राबविण्यासाठी "राजाराम कॅालेज विद्यानगर, कोल्हापूर" यांना रु.३.०० लक्ष (रुपये तीन लक्ष फक्त) मंजूर व मुक्त करण्यात येत आहे. सदर रक्कम प्रस्तावित कार्यक्रम प्रथमत: ५ किल्ल्यांची निवड करून त्यावरील जलस्त्रोताचे संवर्धन व संरक्षणासाठी मुक्त करण्यात येत आहे.

(२)संस्थेचा १० टक्के हिस्सा म्हणजेच किमान रु. ३०,०००/- रक्कमेचा सदर कार्यक्रमात अंतर्भूत असेल.

(३) प्रकल्पांतर्गत वितरीत करण्यात येणारी सर्व माहिती, साहित्य (पोस्टर्स, बॅनर्स इतर) मान्यतेसाठी प्रथम विभागास पाठविण्यात यावी ( सॉफ्ट व हार्ड कॉपी ) विभागाच्या मान्यतेनंतर सदर साहित्य वितरीत करता येईल..

(४) या कार्यक्रमाच्या अनुषंगाने प्रत्येक झालेल्या कार्यक्रमाचा फोटो व व्हिडियो चित्रण काढणे बंधनकारक असून, त्यावर दिनांक व वेळ प्रदर्शित होईल यांची दक्षता घ्यावी व सदर फोटो व व्हिडियो प्रगति अहवालासोबत सादर करावा.

(५) प्रकल्पांतर्गत निवडलेल्या किल्ल्यांचे नांव, कार्यक्रमाच्या रुपरेषा बाबत बाब-निहाय माहिती खर्चाच्या तपशिलासह पर्यावरण विभागास देणे आवश्यक आहे.

(६) मान्य खर्चाच्या बाबींसाठी अन्य कोणत्याही स्त्रोतांमार्फत निधी प्राप्त होत असल्यास सदर बाब पर्यावरण विभागाच्या निदर्शनास आणून विभागाची पूर्व परवानगीने सदर खर्च करणे बंधनकारक आहे.

(७) )संस्थेने दिलेल्या कार्यक्रमानुसार सदर निधीचा खर्च होत असल्याबाबतचे प्रमाणपत्र व प्रगति अहवाल दर महिन्याच्या १० तारखेपूर्वी पर्यावरण विभागास सादर करणे (सॉफ्ट व हार्ड कॉपी)

(८) सदर योजनेच्या अंमलबजावणीत पर्यावरण विभागास काही त्रुटी आढळल्यास त्यानुरुप आवश्यक ती कारवाई, न्यायालयीन कारवाई करण्यास पर्यावरण विभाग मुक्त असेल. तसेच कोणत्याही पूर्व सूचना न देता संस्थेस मंजूर केलेली योजना रद्द करण्याचा पूर्ण अधिकार पर्यावरण विभागाकडे असेल.

(९)उपरोक्त कार्यक्रमाबाबत स्थानिक वृत्तपत्रात प्रसिध्दी देणे बंधनकारक असून सदर बाबतची पेपेर कटींग विभागाकडे सादर करणे.

(१०)योजनांच्या अंमलबजावणीच्या खर्चाचे उपयोगिता प्रमाणपत्र विहित प्रारुपानुसार सादर करणे आवश्यक असेल ("विवरणपत्र-अ") तसेच योजना पूर्ण झाल्यावर त्याच्या यशस्वीपणाबद्दल अहवाल तसेच Completion Report, ऑडिट अहवाल देणे आवश्यक राहील.

(११) प्रकल्पांतर्गत कार्यशाळा, प्रदर्शन, मेळावा, परिषद वा तत्सम उपक्रम होत असल्यास विभागास १० दिवस आधी सदर उपक्रमाबाबत अवगत करावे, जेणे करुन विभागातील प्रतिनिधी सदर उपक्रमास आवश्यकतेनुसार उपस्थित राहू शकतील.

(१२) वरील नमूद बाबींसंदर्भात रु. १००/- कोर्ट फी स्टॅम्प पेपरवर अटी व शर्ती मंजूर असलेले हमीपत्र सादर करणे बंधनकारक आहे.

Ravindra Laxmikant Lakhote

Digitally signed by Ravindra Laxmikant Lakhote
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Section Officer, postalCode=421202, st=Maharashtra, cn=Ravindra Laxmikant Lakhote
Date: 2015.02.24 13:35:14 +05'30'

(र . ल . लखोटे)

**कार्यासन अधिकारी**

**पर्यावरण विभाग, शासन निर्णय क्र. ईएनव्ही-२०१४/प्र.क्र.३६ /तांक-३, दि. २२ जानेवारी,२०१५ चे सहपत्र**

पर्यावरण विभाग, पत्र क्र. इएनव्ही-२०१४/प्र.क्र.३६/तांक-३, दि. ०१ सप्टेंबर, २०१४ नुसार निवड प्राप्त “इंडियन हरपिटोलॉजीकल सोसायटी,पुणे (Indian Herpetological Society) " यांच्या स्थायी पर्यावरणीय विकासाई विविध गोष्टीचे पुनर्चक्रीकरण या संकल्पनेवरील प्रस्तावास सुकाणू समितीच्या निर्णयानुसार राबविण्याच्या कार्यक्रमाबाबतच्या अटी व शर्ती पुढीलप्रमाणे :-

(१) प्रस्तावित संकल्पना राबविण्यासाठी इंडियन हरपिटोलॉजीकल सोसायटी,पुणे (Indian Herpetological Society) यांना रु.१४.८० लक्ष (रुपये चौदा लाख ऐंशी हजार फक्त) मंजूर व मुक्त करण्यात येत आहे. याव्यतिरिक्त संस्थेचा किमान रु. १,५०,०००/- रक्कमेचा सदर कार्यक्रमात अंतर्भूत असेल.

(२) सुमारे ३० गांवतील १०० शाळांमध्ये तसेच स्थानिक युवक ग्रामीण महिला, आदिवासी बांधव यांना कार्यशाळेतून प्रशिक्षण देवून ऊर्जा, पाणी, टाकावू पासून टिकावू वस्तु बनविणे या सारख्या विविध बाबींचे प्रशिक्षण देणे यासाठी सदर निधी मुक्त करण्यात येत आहे. .

(३) कार्यशाळेसाठी वा प्रकल्पांतर्गत वितरीत करण्यात येणारी सर्व माहिती, साहित्य (पोस्टर्स, बॅनर्स इतर) मान्यतेसाठी प्रथम विभागास पाठविण्यात यावी ( सॉफ्ट व हार्ड कॉपी ) विभागाच्या मान्यतेनंतर सदर साहित्य वितरीत करता येईल.

(४) प्रकल्पांतर्गत निवडलेल्या गांव व शाळेचे नांव कार्यक्रम राबविण्याच्या रुपरेषा जसे ठिकाण व दिनांक यांचा तपशिल सादर करावा.

(५) कार्यक्रमाच्यावेळी तसेच प्रकल्पासंबंधित सर्व माहिती वर (पोस्टर्स, बॅनर्स, स्टिकर्स इ.) “पर्यावरण विभाग, महाराष्ट्र शासन पुरस्कृत योजना” असे दर्शनी भागवर ठळक अक्षरात फलक लावणे अथवा प्रदर्शित करणे बंधनकारक आहे. याबाबतचा फोटो दिनांक व वेळ प्रदर्शित होईल यांची दक्षता घेवून शासनाकडे पाठविणे आवश्यक राहिल

(७) मान्य खर्चाच्या बाबींसाठी अन्य कोणत्याही स्त्रोतांमार्फत निधी प्राप्त होत असल्यास सदर बाब पर्यावरण विभागाच्या निदर्शनास आणून विभागाची पूर्व परवानगीने सदर खर्च करणे बंधनकारक आहे.

(८) प्रकल्पांतर्गत कार्यशाळा, प्रदर्शन, मेळावा, परिषद वा तत्सम उपक्रम होत असल्यास विभागास १० दिवस आधी सदर उपक्रमाबाबत अवगत करावे, जेणे करुन विभागातील प्रतिनिधी सदर उपक्रमास आवश्यकतेनुसार उपस्थित राहू शकतील.

(९) संस्थेने दिलेल्या कार्यक्रमानुसार सदर निधीचा खर्च होत असल्याबाबतचे प्रमाणपत्र व प्रगति अहवाल दर महिन्याच्या १० तारखेपूर्वी पर्यावरण विभागास सादर करणे (सॉफ्ट व हार्ड कॉपी)

(१०) प्रकल्पासंबंधित प्रशासकीय / संबंधित यंत्रणेकडून आपला कार्यक्रम यशस्वीपणे पार पडला असल्याचे प्रमाणपत्र प्राप्त करुन ते विभागास सादर करणे.

(११) या कार्यक्रमाच्या अनुषंगाने प्रत्येक झालेल्या कार्यक्रमाचा फोटो व व्हिडियो चित्रण काढणे बंधनकारक असून, त्यावर दिनांक व वेळ प्रदर्शित होईल यांची दक्षता घ्यावी व सदर फोटो व व्हिडियो प्रगति अहवालासोबत सादर करावा.

(१२) सदर योजनेच्या अंमलबजावणीत पर्यावरण विभागास काही त्रुटी आढळल्यास त्यानुरुप आवश्यक ती कारवाई, न्यायालयीन कारवाई करण्यास पर्यावरण विभाग मुक्त असेल. तसेच कोणत्याही पूर्व सूचना न देता संस्थेस मंजूर केलेली योजना रद्द करण्याचा पूर्ण अधिकार पर्यावरण विभागाकडे असेल.

(१३) उपरोक्त कार्यक्रमाबाबत स्थानिक वृत्तपत्रात प्रसिध्दी देणे बंधनकारक असून सदर बाबतची पेपेर कटींग विभागाकडे सादर करणे.

(१४) योजनांच्या अंमलबजावणीच्या खर्चाचे उपयोगिता प्रमाणपत्र विहित प्रारुपानुसार सादर करणे आवश्यक असेल ("विवरणपत्र-अ") तसेच योजना पूर्ण झाल्यावर त्याच्या यशस्वीपणाबद्दल अहवाल तसेच Completion Report, ऑडिट अहवाल देणे आवश्यक राहील.

(१५) वरील नमूद बाबींसंदर्भात रु. १००/- कोर्ट फी स्टॅम्प पेपरवर अटी व शर्ती मंजूर असलेले हमीपत्र सादर करणे बंधनकारक आहे.

Ravindra Laxmikant Lakhote

Digitally signed by Ravindra Laxmikant Lakhote
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Section Officer, postalCode=421202, st=Maharashtra, cn=Ravindra Laxmikant Lakhote
Date: 2015.02.24 13:35:36 +05'30'

(र . ल . लखोटे)

कार्यासन अधिकारी